Sukhkarta Dukhharta

सुखकर्ता दुःखहर्ता (आरती गणपतीची)

STANZA · आरती

1 सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची । नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।
सर्वांगीं सुंदर उटि शेंदुराची । कंठीं झळके माळ मुक्ताफळांची ॥ १ ॥

2 रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा । चंदनाची उटी कुंकुमकेशरा ॥
हिरेजडित मुगुट शोभतो बरा । रुणझुणती नूपुरें चरणीं घागरिया ॥ २ ॥

3 लंबोदर पीतांबर फणिवरबंधना । सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना । संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥ ३ ॥

REFRAIN · ध्रुपद (AFTER EVERY STANZA)

refrain जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती । दर्शनमात्रें मनःकामना पुरती ॥ ध्रु० ॥

Text checked against: भक्तिमार्गप्रदीप (Bhaktimarga Pradip), compiled by Laxman Ramchandra Pangarkar; printing carrying the 15th-edition preface dated Nashik, Shaka 1854 (1932-33); section 3 आरतीसंग्रह, no. 1 आरती गणपतीची. Meanings, audio and all scripts at nityapaath.com/sukhkarta-dukhharta/